# रमेदी माता तीर्थस्थान, रमेदी

## *कुटुंबात करावयाच्या १२ बाबी*

१. कुटुंबातील सर्वांनी दिवसाची सुरुवात 'आंजेलुस' प्रार्थनेने करणे.

२. दररोज कुटुंबात आल्तारासमोर एकत्रित येऊन प्रार्थना करणे.

३. कुटुंबातील सर्वांनी दिवसातून किमान एकवेळ एकत्रित भोजन करणे.

४. दर आठवड्याला कुटुंबातील सर्वांनी एकत्र येऊन संस्कारमय साहित्याचे वाचन व चिंतन करणे.

५. महिन्यातील एक रविवार 'कुटुंब रविवार' म्हणून साजरा करणे.

६. महिन्यातून एकदा कुटुंबातील सर्वानी, एकत्रितपणे, सामाजिक बांधिलकीची जाणीव करुन देणारी भेट देणे.

७. दर महिन्याला कुटुंबाने एकत्रितपणे पवित्र स्थळी भेट देणे व प्रार्थना करणे.

८. कुटुंबातील वडीलधाऱ्या माणसांशी (आजी-आजोबा) वेळोवेळी सुसंवाद (वार्तालाप) करणे.

९. कुटुंबात पर्यावरण संवर्धन दृष्टिकोन विकसित करणे.

१०. परमेश्वराच्या दयेचा अनुभव घेण्यासाठी कुटुंबातील सर्वांनी वर्षातून दोनवेळा 'कुमसार साक्रामेंत' स्वीकारणे.

११. 'राजपिठाची प्रार्थना', रिट्रीट, स्नेहभोजन, धर्मगुरुंसोबत कौटुंबिक वार्तालाप अशा वार्षिक उपक्रमांद्वारे नातेसंबंध दृढ करणे.

१२. कुटुंबातील सर्वांनी चर्चसंलग्न संघटना किंवा गावपरिवारात सक्रिय सहभाग घेणे.

# <u>रमेदी माता तीर्थस्थान, रमेदी</u>

*<u>कुटुंबात करावयाच्या १२ बाबी-विस्तृत</u>*

१. कुटुंबातील सर्वांनी दिवसाची सुरुवात 'आंजेलुस' प्रार्थनेने करणे.

- सकाळी उठताबरोबर दिवसाची सुरुवात 'आंजेलुस' प्रार्थनेने परमेश्वराची आठवण म्हणून करणे. तसेच वैयक्तिक प्रार्थना करणे.

२. दररोज कुटुंबात आल्तारासमोर एकत्रित येऊन प्रार्थना करणे.

- रोझरी - कुटुंबासमवेत वेळ ठरविणे. बायबलवाचन / स्तोत्रसंहिता

३. कुटुंबातील सर्वांनी दिवसातून किमान एकवेळ एकत्रित भोजन करणे.

- दिवसातून किमान एकवेळ एकत्रित भोजन घ्या. दिवसभरात घडलेल्या घटनांविषयी चर्चा करा, सुसंवाद साधा, प्रामाणिकपणे अनुभव कथन करा. (मोबाईल, टि.व्ही., लॅपटॉप, कॉम्प्युटर इत्यादी बंद करणे, डिजिटल संस्कृतीतून कौटुंबिक जीवनावर चिंतन करणे)

४. दर आठवड्याला कुटुंबातील सर्वांनी एकत्र येऊन संस्कारमय साहित्याचे वाचन व चिंतन करणे.

- कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने बायबल वाचन करणे (बेनसिराची बोधवचने / नीतिसूत्रे / याकोबाचे पत्र इत्यादींवर चिंतन करणे.) किंवा पोप फ्रान्सिस ह्यांचे परिपत्रक 'आनंद करा उल्हास करा' वाचणे / 'सुवार्ता', 'शांतीदूत' तसेच वर्तमानपत्रातील अग्रलेख इत्यादींचे वाचन करणे व चर्चा करणे.

५. महिन्यातील एक रविवार 'कुटुंब रविवार' म्हणून साजरा करणे.

- चर्चमध्ये पवित्र मिस्सेसाठी एकत्र येणे. एकमेकांशी प्रामाणिक राहणे, एकत्र भोजन घेणे.

  एकत्रितरित्या समुद्र किनारी फिरायला जाणे, बोध घेता येईल असे एखादे नाटक / चित्रपट पाहणे व त्यावर चर्चा करणे.

६. महिन्यातून एकदा कुटुंबातील सर्वांनी, एकत्रितपणे, सामाजिक बांधिलकीची जाणीव करुन देणारी भेट देणे.

- कुटुंबासमवेत आजारी / मयत व्यक्तीच्या घरी / अनाथाश्रम / वृध्दाश्रम / 'उमेद' अशा संस्थांना भेटी देणे व आपल्या ऐपतीनुसार दानधर्म करणे.

७. दर महिन्याला कुटुंबाने एकत्रितपणे पवित्र स्थळी भेट देणे व प्रार्थना करणे.

- महिन्यातून किमान एकवेळा चॅपलमध्ये एकत्रितपणे मुक प्रार्थना करणे / डोंगर माऊलीजवळ प्रार्थना करणे / रमेदी माऊलीच्या ग्रोटोजवळ प्रार्थना करणे / मिलाग्रीस क्रॉसजवळ प्रार्थना करणे / बाळ येशू सेंटर /वसई किल्ला/ कॅथेड्रल इत्यादी ठिकाणी जाऊन प्रार्थना करणे.

८. कुटुंबातील वडीलधाऱ्या माणसांशी (आजी-आजोबा) सुसंवाद (वार्तालाप) करणे.

- आजी-आजोबांचा आदर करणे, त्यांच्या अनुभव कथनातून धडा घेणे. अडचणी वा समस्यांवर त्यांचा सल्ला घेणे, त्यांचे ऐकून घेणे.

९. कुटुंबात पर्यावरण संवर्धन दृष्टिकोन विकसित करणे.

- पाण्याचा अपव्यय टाळा. विजेचा गैरवापर टाळा, प्लास्टिक बंदी सहकार्य करा. पर्यावरणाचा समतोल राखा, झाडे लावा, अन्नाची नासाडी करु नका. आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवा, सांडपाणी रस्त्यावर सोडू नका, बावखले स्वच्छ ठेवा.

१०. परमेश्वराच्या दयेचा अनुभव घेण्यासाठी कुटुंबातील सर्वांनी वर्षातून दोनवेळा कुमसार साक्रामेंत स्वीकारणे.

- संपूर्ण कुटुंबाने दहा आज्ञांचे पालन करणे व चर्चच्या शिकवणूकीनुसार उपवासकाळात व आगमनकाळात 'कुमसार' करणे.

११. 'राजपिठाची प्रार्थना', रिट्रीट, स्नेहभोजन, धर्मगुरूंसमवेत वार्तालाप अशा उपक्रमांद्वारे नातेसंबंध दृढ करणे.

- कौटुंबिक जवळीक साधणे. धर्मगुरुंची पूर्वपरवानगी घेऊन तासभर कौटुंबिक चर्चा करा मार्गदर्शन घ्या. वार्षिक राजपिठाची प्रार्थना करताना कुटुंबातील लोकांना आमंत्रण करणे.

१२. कुटुंबातील सर्वांनी चर्चसंलग्न संघटना किंवा गावपरिवारात सक्रिय सहभाग घेणे.

- कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचा चर्चसंलग्न संघटना, मूलगामी कार्य इत्यादीमध्ये सहभाग असावा. चर्चमध्ये २५ संघटना कार्यरत आहेत. तसेच गावपरिवारात अनेक सेवाकार्य आहेत. परमेश्वराने आपल्याला अनेक देणग्या दिल्या आहेत त्याचा वापर देवाचे कार्य करण्यासाठी करावा.